# बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय

## प्रेसनोट

दिनांक ०६/०९/२०२४

---

दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील दिनांक ०७/०९/२०२४ ते दिनांक १७/०९/२०२४ रोजीपर्यंत गणेशोत्सव सण मुंबईत मोठया उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. संपुर्ण गणेशोत्सव कालावधीत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळामार्फत आकर्षक सजावटी, देखाव्यासह विविध धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रम देखील राबविले जातात. नमूद सार्वजनिक मंडळांला भाविक वर्ग मोठया प्रमाणात भेटी देतात.

दिनांक ०७/०९/२०२४ ते दिनांक १७/०९/२०२४ रोजीपर्यंत बृहन्मुंबई शहरात गणेशोत्सव सणानिमित्त कायदा व सुव्यवस्था राखणेकामी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली मा. पोलीस सह आयुक्त (का.व सु.), बृहन्मुंबई ह्यांचे देखरेखीखाली बंदोबस्ताचे नियोजन करण्यात आलेले आहे.

नागरिकांना गणेशोत्सव सण सुरक्षितपणे व निर्विघ्नपणे साजरा करता यावा याकरीता मुंबई पोलीस दलाकडून उत्सवाचे काळात किमान **३२ पोलीस उप आयुक्त, ४५ सहायक पोलीस आयुक्त यांच्यासह २४३५ पोलीस अधिकारी व १२४२० पोलीस अंमलदार** बंदोबस्तकामी तैनात करण्यात आलेले आहेत. त्यांचेसोबत महत्वाच्या ठिकाणी एस.आर.पी.एफ. प्लाटून, जलद प्रतिसाद पथक, दंगल नियंत्रण पथक, डेल्टा, कॉम्बॅक्ट, तसेच होमगार्डस् अशा चोख पोलीस बंदोबस्ताचे आयोजन करण्यात आलेले आहे. याशिवाय गणेश विसर्जनाकरीता विशेष बंदोबस्ताचे स्वतंत्रपणे नियोजन करण्यात आले असून त्याकरीता वाढीव बंदोबस्त देखील नेमण्यात येत आहे.

तरी, बृहन्मुंबई पोलीस दलातर्फे नागरिकांना अवाहन करण्यात येते की, गर्दीच्या ठिकाणी संयम दाखवून पोलीसांना सहकार्य करावे, बेवारस वस्तू आढळल्यास पोलीसांना त्याबाबत तात्काळ माहिती दयावी, सर्व नागरिकांनी नियमांचे भान ठेवून गणेशोत्सव उत्साहाने व जल्लोषात साजरा करावा. नागरीकांनी तात्काळ पोलीस मदतीसाठी पोलीस हेल्पलाईन १००, ११२ येथे संपर्क साधावा.

****